मौ.बिजलवाडी ता. देगलूर जि. नांदेड नळ पाणी पुरवठा योजनेच्या सुधारीत अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देणेबाबत

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्रमांकः पापुयो-२०१९/प्र.क्र.१८/पापु-१८
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
तारीख: १९ जून, २०१९

वाचा-

१) ग्रामपंचायत बिजलवाडी ता. देगलूर जि. नांदेड यांचे मूळ अंदाजपत्रकास प्रशासकीय , दि.१७/०४/२०१५.
२) कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, नांदेड यांचे मूळ तांत्रिक मान्यता रजी. क्र. ३७६ दिनांकः- १९/०५/२०१४
३) कार्यकारी अभियंता,ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,जिल्हा परिषद,नांदेड यांनी सुधारीत तांत्रिक सहमती प्रदान केली आहे.
४) शासन पत्र क्रमांकः पापुयो-२०१८/प्र.क्र.११३/पापु-१८,दि. ०९ ऑगस्ट,२०१८
५) कार्यकारी अभियंता,ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,जिल्हा परिषद,नांदेड यांचे योजना सुधारीत करण्याबाबतचे पत्र क्र. जिपना/पापुवि/२५१७, दि. ३०/१०/२०१८

प्रस्तावना-

राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमातंर्गत मौजे.बिजलवाडी ता. देगलूर जि. नांदेड येथील नळ पाणी पुरवठा योजनेस ग्रामपंचायत, मौजे बिजलवाडी ता. देगलूर जि. नांदेड यांनी संदर्भ क्र.१ येथील ठरावान्वये मूळ प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे. सदर योजनेच्या रु.५०,००,०००/-(ढोबळ) किंमतीच्या अंदाजपत्रकास कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, नांदेड यांनी संदर्भीय क्र.२ अन्वये मूळ तांत्रिक मान्यता प्रदान केली आहे. तथापी सदर योजनेच्या ९.९८% जादा दराच्या निविदा स्विकृत झाल्याने योजनेच्या खर्चात वाढ झाली.शासनाच्या सदर्भ ४ अन्वये जादा दराच्या निविदेस कार्योत्तर मान्यता प्रदान केली आहे.कार्यकारी अभियता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, नांदेड यांनी संदर्भ क्र.३ अन्वये सुधारित तांत्रिक सहमती दर्शविली. परिणामी कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, नांदेड यांनी प्रस्तुत नळ पाणी पुरवठा योजनेच्या आराखड्यास व अंदाजपत्रकास सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याचा प्रस्ताव संदर्भाधिन पत्र क्र.५ अन्वये शासनास सादर केला होता. तद्नुषंगाने प्रस्तुत योजनेच्या आराखड्यास व अंदाजपत्रकास सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन निर्णय-

मौजे.बिजलवाडी ता. देगलूर जि. नांदेड या नळ पाणी पुरवठा योजनेच्या रु. ५४,७४,०००./- (ढोबळ) (अक्षरी रुपये चोपन्न लाख चौऱ्याहत्तर हजार फक्त) एवढ्या सुधारित किंमतीच्या अंदाजपत्रकास पुढील अटींच्या अधिन राहून सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

१) सदर योजनेच्या सुधारित अंदाजपत्रकास सुधारित तांत्रिक मान्यता देण्यात यावी.
२) ही योजना जिल्हा परिषदेमार्फत कार्यान्वित करण्यात येईल.
३) या योजनेच्या मुळ प्रशासकीय मंजूरी दिलेल्या शासन निर्णयातील व तांत्रिक मान्यतेच्या आदेशातील अटीं व शर्तींचे काटेकोरपणे पालन करावे.
४) सन २०१३ मधीव CAG यांच्या अहवालानुसार राज्यातील २१ टक्के पाणी पुरवठा योजना या देखभाल दुरुस्ती अभावी वीजदेयक न भरल्यामुळे बंद पडल्या असल्याचे दिसुन येते. त्यामुळे सदर योजना आर्थिकद्दष्ट्या सक्षम राहण्यासाठी पाणी पट्टी दरामध्ये आवश्यकतेनुसार वेळोवेळी वाढ करण्यात यावी.
५) योजनेची चाचणी घेतल्यानंतर योजना संबंधित ग्रामपंचायतीकडे / जिल्हा परिषदेकडे हस्तांतरीत करुन लेखे बंद करण्यात यावेत.
६) योजना राबविणे, त्यांचे परिरक्षण,दुरुस्त्या विशेष दुरुस्त्या धरुन यासाठी दरवर्षी येणारा आवर्ती खर्च भागविण्यासाठी,योजनेत घसारा किंवा यंत्रसामुग्री नुतनीकरणासाठी संबंधित ग्रामपंचायतीस/जिल्हा परिषदेस शासनाकडून कोणतीही मदत/ अनुदान मिळणार नाही.
७) हागणदारी मुक्तीबाबत प्रचलित धोरणानुसार कार्यवाही करण्यात यावी.
८) योजना पुनर्सुधारीत होणार नाही, याची जबाबदारी जिल्हा परिषदेची राहील.
९) योजनेची उर्वरीत कामे ६ महीन्यात पुर्ण करण्यात यावीत

२. या योजनेतील सुधारीत किंमतीतील वाढीव खर्च रु. ४,७४,७१४ /- (अक्षरी चार लाख चौऱ्याहत्तर हजार सातशे चौदा रुपये फक्त) हा राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत राज्य हिश्श्यातुन/जिल्हा नियोजन मंडळाकडुन / किमान गरजा कार्यक्रमांतर्गत उपलब्ध होणाऱ्या निधीतुन करण्यात यावा.

३. प्रस्तुत योजनेस सुधारीत प्रशासकीय मान्यता ही वित्त विभागाच्या दि. १७/०४/२०१५ च्या क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३ विनियम, भाग-२ या शासन निर्णयातील भाग पहीला,उपविभाग-३ मधील अ.क्र. ६ (सहा) परिच्छेद क्र.२७ (अ) अनुसार विभागास प्रदान करण्यात आलेल्या प्राधिकारानुसार देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०६२०१२०२०१४३२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Suresh Sawairam Rathod

Digitally signed by Suresh Sawairam Rathod
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Supply and Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e695ebef4b8a6c860bec48f3ef34f42f0c13f8d1aa06f854d5b9bd6874084124, serialNumber=bcaaf1242528ff3cdece2c8eb03929321c1c09c0a7c4d906e3b8a47677ad9769, cn=Suresh Sawairam Rathod
Date: 2019.06.20 12:03:46 +05'30'

(सु.स.राठोड)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मंत्री,पाणी पुरवठा व स्वच्छता.

२. मा.राज्यमंत्री,पाणी पुरवठा व स्वच्छता.
३. मा.विरोधी पक्षनेता,महाराष्ट्र विधानसभा/विधान परिषद
४. मा.विधानमंडळ सदस्य (सर्व)
५. सदस्य सचिव,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,मुंबई.
६. मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,नांदेड
७. महालेखापाल,लेखा परिक्षा,महाराष्ट्र-२,नागपुर
८. महालेखापाल,लेखा परिक्षा,महाराष्ट्र-१,मुंबई
९. संचालक,पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था (वासो),बेलापुर,नवी मुंबई.
१०. मुख्य अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,औरंगाबाद.
११. अधीक्षक अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,नांदेड
१२. संचालक(वित्त),महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,सिडको भवन,बेलापुर,नवी मुंबई.
१३. उपसंचालक,भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा,लातुर
१४. वरिष्ठ भुवैज्ञानिक,भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा,
१५. कार्यकारी अभियंता,ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,जिल्हा परिषद,नांदेड.
१६. अतिरीक्त मुख्य सचिव,नियोजन विभाग यांचे स्वीय सहायक,मंत्रालय,मुंबई.
१७. अपर मुख्य सचिव,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे स्वीय सहाय्यक,मंत्रालय,मुंबई
१८.प्रधान सचिव,वित्त विभाग यांचे स्वीय सहाय्यक,मंत्रालय,मुंबई.
१९.मु.अ.तथा वि.का.अ. ,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे स्वीय सहाय्यक,मंत्रालय,मुंबई.
२०.कार्यासने (पापु-०४,०६,०७,०९,१०,१३,१७ व २०),पा.पु.व स्व.वि.,मंत्रालय,मुंबई.
२१. निवडनस्ती कार्यासन पापु-१८.